# ऋणनिर्देश

आपणा सर्वांच्या सहकार्याने आपल्या हातात बँकेचा ९३ वा वार्षिक अहवाल सूपूर्द करताना मला अत्यानंद होत आहे. कोणत्याही संस्थेची प्रगती सभासद, खातेदार, हितचिंतक तसेच संस्थेचे व्यवस्थापन यावर अवलंबून असते. आपण केलेल्या बहुमोल सूचनांचा आदर करत वर्षभरात केलेल्या कामाचे मूल्यमापन व्हावे व आपल्याकडून शाबासकीची पोच पावती मिळावी ही अपेक्षा. बँकेच्या ध्येयपूर्तीसाठी ज्यांचा सहभाग लाभला त्यांचा ऋणनिर्देश व त्यांच्या प्रती आभार व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाच्या विविध कार्यालयातील विभागप्रमुख, आस्थापना अधिकारी, आहरण व संवितरण अधिकारी आणि रोखपाल यांच्याकडून सभासदांच्या वेतनातून करावयाची वसूली व विशेषतः कर्ज थकबाकी वसूलीसाठी जे बहुमोल सहकार्य लाभते, त्याबद्दल संचालक मंडळ व व्यवस्थापन त्यांचे मनापासून आभार मानतो. अहवाल वर्षात मा. संचालक मंडळाने सभासद, ठेवीदार व खातेदार यांच्यासाठी पुढील सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत.

१. बँकेचे वर्षात अद्यावत मोबाईल ॲप सुरु करण्यात आले असून याद्वारे सभासद, ठेवीदार व खातेदार खात्यातील शिल्लक तपासणे, ई-मेल द्वारे खात्याचे विवरण प्राप्त करणे, Debit Card Pin Change / Block / Unblock करणे, खात्यात पैसे जमा करणे अथवा अन्य खात्यात पैसे वर्ग करणे, ओव्हरड्राफ्ट कर्जाची उचल व परतफेड करणे इत्यादी व्यवहार करु शकतात. NEFT / RTGS / IMPS सुविधे द्वारे एका दिवसाला रु. ५०,०००/- पर्यंत रक्कम भारतातील कोणत्याही बँकेच्या खात्यात जमा करता येते व या सुविधेवर कोणतेही शूल्क आकारले जात नाही. UPI सेवा सुरु करण्यात आली असून PhonePe, GPay, Paytm, BHIM, इत्यादी ॲपला आपले खाते लिंक करुन मा. सभासद व खातेदार आपले आर्थिक व्यवहार करु शकतात. BillDesk या सेवेद्वारे मा. सभासद व खातेदार वीज बिल, पाणी बील, मोबाईल रिचार्ज व सर्व प्रकारच्या बीलाचा भरणा करु शकतात RuPay ATM कार्ड द्वारे भारतातील कोणत्याही ATM मधून एका दिवसाला रु. १०,०००/- रक्कम काढता येते व रु. ५०,०००/- पर्यंत Online खरेदी करता येते. या कार्डवर कोणतेही शूल्क आकारले जात नाही.

२. मा. सभासद व ठेवीदारांसाठी नवीन पेन्शन योजना २०२१ व शताब्दी लखपती योजना सुरु केल्या आहेत. या योजनेवर ७% व्याज देण्यात येत असून याचा लाभ सर्व मा. सभासद, खातेदार व ठेवीदार यांनी घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे. अहवाल वर्षात मा. सभासदांना सूटसूटीत, कमी कागदपत्रे व कमी वेळ लागणारी ओव्हरड्राफ्ट कर्ज सुविधा सुरु केली आहे. याद्वारे पाच वर्षाकरीता एकदाच अर्ज भरुन रु. ३,००,०००/- रक्कम घेता येते. मोबाईल ॲपद्वारे कितीही वेळा ओव्हरड्राफ्ट रकमेची उचल अथवा परतफेड करता येते. यासाठी एक जामीनदाराची आवश्यकता राहील.

नवीन Overdraft कर्ज, Pension योजना, Rupay ATM कार्ड व RTGS / NEFT सुविधा याला मा. सभासदांनी भरभरुन प्रतिसाद दिला त्याबद्दल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे. यापुढेही मा. सभासदांसाठी नवीन सेवा / सुविधा अंमलात आणण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. या सर्व सुविधा व योजनांचा जास्तीत जास्त लाभ सर्व मा. सभासदांनी घ्यावा व भविष्यातही मा. सभासदांचे असेच सहकार्य लाभेल अशी आशा. या कामासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न / सहकार्य केले आहे, त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

POS Machine व्दारे मा. सभासदांना खात्यात पैसे जमा करणे / काढणे, कर्ज हप्ता जमा करणे, डेबीट कार्ड वितरण, नवीन खाते उघडणे इ. Banking सेवा / सुविधा पुरवून त्यांना बँकेत येण्याची गरज भासणार नाही यासाठी जागेवर सेवा / सुविधा देण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानात आपली बँक कुठेही कमी पडणार नाही यासाठी बँकेचे मा. संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचारी प्रयत्नशील आहेत. याबाबत आपल्याकडून नियमित सूचना व सहकार्य मिळेल अशी मी आशा व्यक्त करतो.

कार्यकारी अभियंता / उप अभियंता (स्थापत्य / विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, बांद्रा व कोंकण भवन येथील व्यवस्थापनाच्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत. बँकेचे कार्यक्षेत्र विस्तारण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने पुणे, अहमदनगर, नाशिक व पालघर या लगतच्या जिल्ह्यात कार्यक्षेत्र वाढविण्यास मंजूरी दिली आहे. याला ९३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूरी दिल्यानंतर आगामी काळात उपरोक्त मंजूरी मिळालेल्या कार्यक्षेत्रात बँकेच्या शाखा सुरु करण्याचा मनोदय आहे. याबाबत रिझर्व्ह बँक व सहकार विभाग यांचे वेळोवेळी मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करीत आहोत.

मुद्रांकनियंत्रक, प्रधान मुद्रांककार्यालय, पुणे व अप्पर मुद्रांकनियंत्रक, प्रधान मुद्रांककार्यालय, मुंबई व त्यांचे सहकारी अधिकारी / कर्मचारी यांचे बँकेला मुद्रांक विक्री व्यवसायाकरीता नेहमीच सहकार्य लाभले आहे. बँकेत मुद्रांक विक्री बरोबरच नवीन फ्रँकींग मशीन उपलब्ध होत असून फ्रँकींग सुविधा चालू करण्याची कार्यवाही प्रशासनाने चालू केली असून लवकरच ती सुविधा सभासद व ग्राहकांना मिळेल. याकामी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे संचालक मंडळ व व्यवस्थापन आभारी आहे.

बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचारी ध्येय व कार्य यांचा सतत पाठपुरावा करीत व आपुलकीचे ग्राहक संबंध जपत आर्थिक व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञान लक्षात घेऊन सभासदांना अत्याधुनिक सेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रगतीमध्ये कर्मचारी / अधिकारी यांची निष्ठा त्यांनी व्यवस्थापनास दिलेला सहयोग महत्त्वाचा आहे. आपला सहयोग असाच कायम रहावा हीच अपेक्षा व्यक्त करतो. संचालक मंडळ संस्थेच्या होत असलेल्या प्रगती बद्दल सभासद, खातेदार व हितचिंतक यांचा ऋणी आहे.

संचालक मंडळाच्या वतीने व व्यक्तीगत रित्या मी आपले पुनःश्च आभार व्यक्त करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

संचालक मंडळाच्या वतीने
आपला स्नेहांकित
सही/-
**(श्री. प्रमोद बा. पंडित)**
अध्यक्ष

**ठिकाण : मुंबई**
दिनांक : २३ ऑगस्ट, २०२२